# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १९/०८/२०२४ (सोमवार) सायंकाळ

---

### अवैद्य दारू धंदयावर नरखेड पोलीसांची कारवाई

१) दिनांक १८/०८/२०२४ रोजी नरखेड शहरात अवैद्यरित्या दारू विक्री होत असल्याबाबत गोपनिय माहिती वरून पोलीस पथकाने नरखेड शहरातील ईसम नामे दिनेश सोमकुंवर याचे राहत्या घरी अवैद्यरित्या दारू विक्री बाबत रेड केली असता त्याचे राहते घरात १५ लिटर मोहाफुल गावठी दारू किमती ७५०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपी विरूध्द पोस्टेला महा. दारूबंदी कायदा अन्यये गुन्हा नोंद केला.

२) दिनांक १८/०८/२०२४ रोजी नरखेड शहरात अवैधरित्या दारू विक्री होत असल्याबाबत गोपनिय माहिती वरून पोलीस पथकाने नरखेड शहरातील ईसम नामे उमेश गजबे याचे राहत्या घरी अवैद्यरित्या दारू विक्री बाबत रेड केली असता त्याचे राहते घराचे समोरील सामटीत ६ प्लास्टिक डबक्या प्रत्येकी १५ लिटर क्षमतेच्या असा एकुण ९० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ४,५००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूध्द पोस्टेला कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंद केला.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. श्री बापू रोहोम सा. उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब काटोल विभाग काटोल यांच्या मार्गदर्शनात स.पो.नि अजित आ. कदम ठाणेदार पोलीस स्टेशन नरखेड, पोउपनि गणेश पडवार व पोलीस स्टॉफ पोहवा गजानन तितरे, मपोहवा मनिषा सावरकर, पोशि जालिंदर राठोड, पोशि गणेश ताजणे, पोशि उत्तरेश्वर ठोंबरे, पोशि केवल आडे पोलीस स्टेशन नरखेड यांनी केली आहे.



## मोटारपंप चोरीतील अज्ञात आरोपीचा शोध घेण्यात नरखेड पोलीसांना यश

दिनांक १७/०८/२०२४ रोजी फिर्यादी नामे रामचंद्र गुलाबराव कुमरे, वय ४२ वर्ष रा. चिचोली (मध्यप्रदेश) यांनी पोलीस स्टेशन नरखेड येथे तोंडी रिपोर्ट दिली की, दिनाक १६/०८/२०२४ चे १८/०० वा. ते दिनांक १७/०८/२०२४ चे ०७/०० वा. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या पिपळा खुर्द शेतशिवारातील विहीरीवर लावलेली टेक्सोमो कंपनीची मोटारपंप किंमती ५,०००/— रूपयाची चोरी करून घेवून गेल्याचे तक्रारीवरून पोलीस स्टेशन नरखेड येथे अप. क्र. ३८०/२०२४ कलम ३०३ (२) बि.एन.एस प्रमाणे गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर गुन्हयातील चोरीस गेलेली मोटारपंप व अज्ञात आरोपीचा शोध कामी तपास पथक तयार करून शोध घेतला असता तपास पथकाने कौशल्यपुर्ण व तांत्रिक तपास करून चोरीस गेली मोटारपंप व अज्ञात आरोपीचा शोध घेवून **आरोपी नामे गोपाल जगण कुमरे, वय ३६ वर्ष, रा. खापरी गोसाई ता. नरखेड** यास ताब्यात घेवून विचारपूस करून चोरीस गेली मोटारपंप किंमती ५,०००/— रूपयाचा मुद्देमाल हस्तगत केला.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. श्री बापू रोहोम सा. उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब काटोल विभाग काटोल यांच्या मार्गदर्शनात स.पो.नि अजित आ.कदम ठाणेदार पोलीस स्टेशन नरखेड व पोलीस स्टॉफ सफौ शैलेश डोंगरदिवे, पोहवा राकेश सव्वालाखे, पोहवा गजानन तितरे, पो.ना साबिर शेख, पोशि जालिदर राठोड, पोशि किशोर निखाडे पोलीस स्टेशन नरखेड यांनी केली.

## पोलीस स्टेशन मौदा येथील जुगार अडडयावर धाड

दि. १८/०८/२०२४ रोजीचे सायंकाळी ५/०० वा. ते ०६/०० वा. दरम्याण पोलीस स्टेशन मौदा हद्दित पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली की, मौजा दिघोरी काळे शेत शिवारात काही ईसम हे ५२ ताशपत्त्यावर पैश्याची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळत आहे. अशा माहितीवरुन दिघोरी काळे शेत शिवारात गेलो असता काही ईसम हे पडीत शेतात तासपत्त्यावर जुगार खेळतांनी दिसले. यावरुन त्यांना घेराव टाकुन पकडण्यास गेलो असता काही ईसम मौक्कावरुन पळुन गेले व उर्वरीत **१) जितेन्द्र मोरेश्वर कुडे, वय २५ वर्षे, राह. प्लॉट नं. २०६६, पारडी पोलीस ट्राफीक चौकी जवळ, पारडी नागपुर, २) सुरज रवीकर नारनवरे, वय २४ वर्षे, राह. प्लॉट नं. ५७, घटाटे नगर, पारडी, नागपुर, ३) हरीष रामदास मेहत्रे, वय २३ वर्षे, राह. प्लॉट नं. ५३, भवानी नगर, पारडी, नागपुर, ४) अब्दुल रहेमान अब्दुल जब्बार, वय ३९ वर्षे, राह. प्लॉट नं. ८१, गंगाबाग, पारडी, नागपुर, ५) सागर सुधाकर महल्ले, वय ३२ वर्षे, प्लॉट नं. ११९, भवानी नगर, पारडी, नागपुर, ६) चेतन अशोकरावजी भुरके, वय ३० वर्षे, पारडी पोलीस ट्राफीक चौकी जवळ, पारडी, नागपुर ७) रोहीत तेजराम सिन्हा, वय २४ वर्षे, राह. प्लॉट नं. १४५, पुनापुर रोड, गंगाबाग, पारडी, नागपूर, ८) विनय तंबी मुदलीयार, वय २५ वर्षे, राह. प्लॉट नं. १, सुभाष मैदान, टालपुरा, पारडी, नागपुर** यांना मौक्कावरुन ताब्यात घेतले. घटणास्थळावरुन १) हिरो होंडा सी. डी. डॉन मो.सा. क्र. MH-31/BY-0059 २) हिरो होंडा पॅशन मो.सा. क्र. MH-40/U-2508 ३) हिरो पॅशन मो.सा.क्र. MH-49/AN-7609 ४) होन्डा अॅक्टीव्हा क्र. MH-31/DN-9061 ५) टिव्हीएस ज्युपीटर क्र. MH-49/BT-3617 ६) हिरो स्प्लेंन्डर मो.सा. क्र. MH-49/AX-7145 ७) मारोती स्विफ्ट कार क्र. MH-49/AT-4678 मिळुन आल्या. ताब्यात घेतलेल्या आरोपीचे अंगझडती व डावावर मांडलेले नगदी ६,९१०/—रु. तसेच मोबाईल कि. ७३,०००/— रु. व वाहन कि.

६,७८,०००/—रु. असा एकुण ७,५७,९१०/—रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद आरोपीविरुद्ध पोस्टे मौदा येथे अप क्र. ८०५/२०२४ कलम १२ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर कारवाई मा. श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक सा. ना. ग्रा., मा. श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक सा. ना.ग्रा. मा. श्री. संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान यांचे मार्गदर्शनात श्री. प्रमोद घोंगे पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन मौदा यांचे सोबत पोलीस स्टॉप सपोनि मनोज चौधरी, पोउपनि महेश बोथले, पोहवा संदीप कडु, राजु आंधळे, गणेश मुदमाळी, रुपेश महादुले, प्रकाश गाठे, पोना दिपक दरोडे, तुषार कुडुपले, पोशि नितीन सार्वे, आतिश गाढवे यांनी केली आहे.



## अवैधरीत्या देशी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दि. १८/०८/२०२४ रोजीचे रात्री ८/०० वा. दरम्याण पोलीस स्टेशन मौदा हद्दित पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, एक ईसम ॲक्टिव्हा गाडीने जयस्तंभ चौका कडुन बस स्टॉप कडे देशी दारुची अवैद्यरित्या विनापरवाना वाहतुक करीत असल्याची माहीती मिळाल्याने जयस्तंभ चौकात नाकाबंदी करुन होन्डा ॲक्टिव्हा मोपेड क्र. MH-40/AS-0510 चे चालक नामे नितीन लक्ष्मीनारायण जैयस्वाल, वय ४० वर्षे, राह. कृष्ण मंदीर जवळ मौदा याला पकडण्यात आले, त्याचे मोपेडची झडती घेतली असता मोपेडवर ठेवलेल्या पांढ—या पिशवीत देशी दारुच्या दोन पेट्या ज्यामध्ये १८० मि.ली. ने भरलेल्या ९६ निपा मिळुन आल्याने आरोपी नितीन लक्ष्मीनारायण जैयस्वाल, वय ४० वर्षे, राह. कृष्ण मंदीर जवळ, मौदा याचे ताब्यातुन देशी दारुने भरलेल्या १८० मि.ली. ने भरलेल्या ९६ निपा कि. ६,७२०/—रु. व होन्डा ॲक्टिव्हा मोपेड क्र. MH-40/AS-0510 कि. ५०,०००/—रु. असा एकुण ५६,७२०/—रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात येवुन आरोपी विरुद्ध पोस्टे मौदा येथे अप क्र. ८०७/२०२४ कलम ६५ (अ) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. श्री. संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान यांचे मार्गदर्शनात श्री. प्रमोद घोंगे पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन मौदा यांचे सोबत पोलीस स्टाफ पोउपनि महेश बोथले, पोहवा संदीप कडु, गणेश मुदमाळी, रुपेश महादुले, पोना दिपक दरोडे,, पोशि आतिश गाढवे यांनी केली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर